# राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ : समस्या आणि आव्हाने

**रेणुकादास उबाळे,**
मराठी विभागप्रमुख,
एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर
९४२३२१७७३८
renukadas1983@gmail.com

---

***सारांश :***

*भारतीय संविधान आपल्या प्रास्ताविकेतूनच देशातील सर्व नागरिकांना दर्जाची आणि संधीची समानता प्रदान करण्याची हमी देते. सामान्य नागरिकांच्या जीवनात दर्जाची आणि संधीची ही समानता प्राप्त करून देण्याचे महत्त्वाचे माध्यम म्हणजे नेमके कोणते आहे? तर 'शिक्षण' हे त्यावरील एकमेव उत्तर असू शकते. शिक्षण हेच एक असे माध्यम आहे की, त्या माध्यमातून प्रत्येक नागरिक आपल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती व दुरावस्थेची कोंडी फोडू शकतो व त्यातून आपले सकारात्मक भवितव्य घडवू शकतो. नवीन शिक्षण धोरणातील 'शाळा संकुल' ही संकल्पना म्हणजे सरकारने आपल्या संसाधनांची बचत करीत, त्यावरील खर्च टाळून शोधलेली सोपी पळवाट आहे. या धोरणात विद्यार्थी व एकंदर समाजाला शैक्षणिक गळतीची जाणीवच न होऊ देता सरकारने उच्च शिक्षणातील शैक्षणिक गळतीचे समर्थनच केले आहे. तसेच शिक्षणातील खाजगीकरणाचे खुलेआमपणे सरकारने धोरणाच्या माध्यमातून समर्थन केले आहे. आजपर्यंत शिक्षणाच्या व्यापारीकरण्यासाठी खाजगीकरण हेच महत्त्वाचे कारण ठरले आहे. या वास्तवाची कुठलीच जाणीव न ठेवणे हे अत्यंत विसंगतीपूर्ण आहे. आजच्या विषमताग्रस्त वातावरणात नवीन शिक्षण धोरणाचे हे आव्हान अधिकाधिक गंभीर व विदारक ठरणार आहे. त्यामुळे वेळीच भारतातील लोकमानस जागृत होणे आवश्यक आहे. भारतातील सर्व विद्यार्थ्यांना समान, दर्जेदार, मोफत व राज्यवित्तपोषित शिक्षण मिळवण्याच्या सामूहिक प्रयत्नातूनच यावर मात करता येईल.*

---

**बीजशब्द :** नवीन शिक्षण धोरण, शिक्षणाचे खाजगीकरण, स्तरिकरण, गळती, शाळा संकुल

**प्रस्तावना :**

केंद्र सरकारने नुकतेच नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण स्वीकारले आहे. ३० मे २०१९ साली कस्तुरीरंगन समितीने सादर केलेल्या मसुद्याचे हे मूर्त स्वरूप आहे. हा मसुदा सुरुवातीला केवळ हिंदी आणि इंग्रजी या दोनच भाषांमध्ये प्रकाशित करण्यात आला. भारतातील २२ अधिकृत भाषांपैकी केवळ दोनच भाषांमध्ये मसुदा असल्याने इतर भाषिक लोकांना त्याचे नीटसे आकलन झाले नाही. हिंदीतील हा मसुदा ६५० पानांचा तर इंग्रजीतील मसुदा ४८४ पानांचा आहे. लोकाग्रहाखातर शेवटी इतर भाषांमध्ये या मसुद्याचे सारांश प्रसिद्ध करण्यात आले. शिवाय प्रसारमाध्यमे व शासकीय कार्यालयामार्फत या धोरणातील तरतुदींचा धडाक्याने सकारात्मक प्रसार व प्रचार करण्यात आला. मुख्यत: शिक्षण व्यवस्थेतील संरचनेत झालेला बदल सामान्य लोकांना माहीत झलेला आहे. १०+२+३ हा प्रचलित आकृतीबंध बदलून ५+३+३+४ असा नवा आकृतीबंध या धोरणात स्वीकारलेला आहे याची चर्चा सर्वत्र आहे. परंतु शिक्षण व्यवस्थेतील बदल हे दर्जात्मक, गुणात्मक, मूल्यात्मक व सर्वसमावेशक आहेत का? याची चर्चा मात्र कुठेही दिसत नाही. आज साधारणत: या धोरणाबाबत

पूर्णतः समर्थन करणाऱ्या, त्यात सुधारणा सुचविणाऱ्या व हे धोरण पूर्णपणे नाकारणाऱ्या अशा तीन प्रकारच्या प्रतिक्रिया सर्वत्र दिसून येत आहेत.

भारतीय संविधान आपल्या प्रास्ताविकेतूनच देशातील सर्व नागरिकांना दर्जाची आणि संधीची समानता प्रदान करण्याची हमी देते. सामान्य नागरिकांच्या जीवनात दर्जाची आणि संधीची ही समानता प्राप्त करून देण्याचे महत्त्वाचे माध्यम म्हणजे नेमके कोणते आहे? तर 'शिक्षण' हे त्यावरील एकमेव उत्तर असू शकते. शिक्षण हेच एक असे माध्यम आहे की, त्या माध्यमातून प्रत्येक नागरिक आपल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती व दुरावस्थेची कोंडी फोडू शकतो व त्यातून आपले सकारात्मक भवितव्य घडवू शकतो. ''भारताचा शिक्षण संघर्ष जितका प्राचीन आहे, तितकाच सखोल आहे. स्त्री शुद्रातिशुद्रांना शिक्षणबंदीच्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्योत्तर शिक्षण धोरणापर्यंतचा शिक्षण संघर्ष सुरू आहे. हा संघर्ष शिक्षणापुरता सुटा नाही. तर तो व्यापक समाजव्यवस्थेच्या संघर्षाचा भाग म्हणून राहिलेला आहे. आहे ती समाजव्यवस्था टिकविण्यासाठी व बदलण्यासाठी शिक्षणातील राजकारण दोन्ही बाजुंनी सतत कार्यरत आहे.''[१] भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक व्यवस्थेत शिक्षणाची दारे सर्वसामान्यांना खुली होण्याकरिता आधुनिक काळापर्यंत वाट पहावी लागली. जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुढाकाराने सर्वसामान्य भारतीय स्त्री पुरुषांच्या शिक्षणाचा मुद्दा स्पष्टपणे समोर आला. समाजातील सर्व वंचित बहुजन वर्गाच्या शिक्षण प्राप्तीचे व त्यासंबंधीच्या मूलभूत अधिकाराचे ते पहिले कृतिशील पाऊल ठरले.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची पायरी केवळ दहा वर्षात गाठली जाईल, अशी योजना होती. मात्र १९६० सालापर्यंत सर्वांना शिक्षण मिळणे तर दूरच, पण ५० वर्षांनंतरही भारतात ते उद्दिष्ट किमान पातळीवर साध्य होऊ शकले नाही. २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण ३५ टक्के लोक निरक्षर होते. यातील महिलांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण ४६ टक्के, मागासवर्गीय जातीतील लोकांमध्ये ४६ टक्के आणि मागासवर्गीय जमातीतील लोकांमध्ये हे प्रमाण ५१ टक्के असे होते. या काळात देशातील पदवीधर लोकांचे प्रमाण जवळपास १०/११ टक्के एवढेच होते. २०११ च्या दरम्यान सुद्धा निरक्षरांची संख्या केवळ २६ टक्क्यांपर्यंत कमी झालेली आहे. ज्यामध्ये महिलांचे प्रमाण ३५ टक्के एवढे आहे. आपल्या देशातील साक्षरतेसंदर्भातील ही आकडेवारी निश्चितच आनंददायक व समाधानकारक नाही. अशा अवस्थेत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करून त्याआधारे इथल्या नागरिकांना सर्वार्थाने सक्षम बनविणे हेच फार मोठे आव्हानात्मक कार्य ठरते.

१९९१ च्या सुमारास भारताने खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. अनेक क्षेत्रांमध्ये खाजगीकरणाचे धोरण स्वीकारले. साहजिकच याचा परिणाम शिक्षण क्षेत्रावरही पडला. यानंतरच्या काळात भारतात खाजगी शिक्षण संस्थांचे प्रमाण मोठ्या संख्येने वाढले. परिणामी शिक्षण क्षेत्रातील स्तरिकरण वाढून शिक्षण व्यवस्थेला बाजाराचे स्वरूप सुद्धा प्राप्त झाले. खाजगी शाळांच्या दर्जाचा प्रसार व इंग्रजी माध्यमातील शिक्षणाचे अवाजवी आकर्षण यामुळे सरकारी शाळा, महाविद्यालयांकडे सर्वांचेच अक्षम्य दुर्लक्ष झाले. तसेच सरकारी शाळा, महाविद्यालयांचे प्रमाण कमी होत खाजगी शाळा, महाविद्यालयांचे प्रमाण प्रचंड स्वरूपात वाढले. या सर्व पार्श्वभूमीचा संदर्भ आजच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणातील नीतीशी व संकल्पनांशी जोडलेला आहे.

भारतीय शिक्षण व्यवस्थेतील कुठल्याही एका टप्प्याची चर्चा ही सुटेपणाने करता येत नाही. उदा. आपल्याला उच्च शिक्षणावर विचार करताना त्याची पार्श्वभूमी म्हणून शालेय व प्राथमिक शिक्षणातील परिस्थितीचीही दखल घ्यावी लागते. भारतीय संविधानाप्रमाणे शिक्षण हा भारतातील नागरिकांचा मूलभूत अधिकार ठरतो. त्या अर्थाने इथल्या प्रत्येक लहान बालकास दर्जेदार शिक्षण प्रदान करणे हे राज्याचे कर्तव्य ठरते. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ मध्ये 'स्कूल कॉम्प्लेक्स' (शाळा संकुल) या नव्या संकल्पनेची मांडणी करण्यात आली आहे. पूर्व प्राथमिक ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना एकाच छताखाली शिक्षण देण्याची आभासी संकल्पना यात मांडली आहे. वास्तविक पाहता कमी पटसंख्येच्या शाळा बंद पाडण्याचा हा छुपा अजेंडा आहे. ''गटबद्ध करणाच्या या उपक्रमामध्ये विद्यमान शाळांच्या अवस्थांचे पुनर्विलोकन करून ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या अतिशय कमी आहे. (उदा. २० पेक्षा कमी विद्यार्थी) अशा शाळांचे विलीनीकरण करण्यात येईल. मात्र असे करताना मुलांना शाळेमध्ये ये–जा करण्यात कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणून दळणवळणाची आवश्यक सुविधा पुरविण्यात येईल. या माध्यमातून राज्य शासनाला विद्यमान शाळांच्या अवस्थेची छाननी करण्याचीही संधी मिळेल''[२] असे मसुद्यात नमूद केले आहे. खरे पाहता आपल्याच गावात, ग्रामीण भागात, आपल्या जवळ सरकारी शाळा उपलब्ध असावी, हा सामान्य नागरिकांचा हक्क आहे. २००९ मध्ये 'शिक्षण हक्क कायद्यात' याबाबत स्पष्ट तरतुदी केल्या आहेत. एवढेच नव्हे तर, ठरावीक अंतरावर सरकारी शाळा उपलब्ध असणे बंधनकारकही केलेले आहे. परंतु 'स्कूल कॉम्प्लेक्स' ही संकल्पना त्यापासून पूर्णत: विसंगत ठरते आणि विद्यार्थ्यांच्या जवळ शाळा उपलब्ध असण्याचा विद्यार्थ्यांचा महत्त्वाचा अधिकार त्यांच्याकडून हिरावून घेते. कमी पटसंख्येचे कारण पुढे करत सरकारकडून सरकारी शाळा बंद करण्याचे धोरण राबवले जात आहे. खरे पाहता, कमी पटसंख्या असण्याची कारणे शोधून सरकारी शाळांना बळकटी देण्याची आवशक्यता आहे. खाजगी शाळांच्या अवाजवी उदात्तीकरणाला आळा घालत सरकारी शाळांच्या दर्जात्मक विकासाकरिता प्रयत्नांची शर्त करणे सार्वजनिक हिताचे आहे. परंतु सरकारकडून तसे प्रयत्न न होता उलट सरकारी शाळा बंद पाडण्याचाच प्रयत्न मोठ्या प्रमाणात दिसून येतो. शिवाय 'शाळा बंद पाडणे' असा शब्दप्रयोग न करता 'समायोजन करणे' असा गोंडस शब्द वापरून समाजाची दिशाभूल करण्याचा घाट त्यातून साध्य होतो. शाळा संकुलाचे समर्थन करण्यासाठी मसुद्यात काही युक्तिवाद केले आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत. १) शाळा संकुलातून एकल (एक शिक्षकी) शाळांचा प्रश्न सुटेल. २) त्यातून विषय तज्ज्ञ शिक्षक शाळेतील सर्व वर्गांना उपलब्ध होतील. ३) सर्व शाळांना संसाधने उपलब्ध करून देऊ शकत नसल्यामुळे पोर्टेबल पद्धतीने संसाधनाची कमतरता भरून काढता येईल.[३] ४) स्कूल कॉम्प्लेक्स पद्धतीने शिक्षकांची उणीव भरून निघण्यास मदत होईल. ५) समूहाने विद्यार्थी व शिक्षकांना शिकता येईल. ६) कमी पटसंख्येच्या शाळा आर्थिकदृष्ट्या परवडणा–या नाहीत.[४] इ. वास्तविक पाहता, हे सर्व युक्तिवाद मूळ प्रश्नांना थेट हात न घालता व मूलभूत उपायांना टाळून शोधलेली पळवाट आहे.

शाळा संकुलाच्या संकल्पनेत ५ ते १० मैल म्हणजेच १५ ते ३० किलोमीटरच्या अंतरावर शाळा संकुल असावे असे मानले आहे. २००९ च्या शिक्षण हक्क कायद्यात मात्र विद्यार्थ्यांच्या निवासापासून प्राथमिक शाळा १ किलोमीटरच्या अंतरावर, उच्च प्राथमिक शाळा ३ किलोमीटरच्या अंतरावर व माध्यमिक शाळा ५ किलोमीटरच्या अंतरावर असणे अपेक्षित आहे. ज्यापासून शाळा संकुलाची संकल्पना पूर्णत: विसंगत आहे विद्यार्थ्यांच्या जवळ शाळा असण्याच्या मुख्य अधिकारापासून त्यांना वंचित ठेवणारी आहे. आपल्या घरापासून शाळा किमान अंतरावर नसेल तर सामान्य वर्ग किंवा निम्न आर्थिक वर्गातील कुटुंब आपल्या पाल्यांना

नाईलाजाने शाळेत पाठवणार नाहीत व बहुतांश विद्यार्थी शिक्षणाच्या प्रक्रियेपासूनच दूर फेकले जातील. थोडक्यात, शाळा संकुल ही संकल्पना म्हणजे सरकारने आपल्या संसाधनांची बचत करीत, त्यावरील खर्च टाळून शोधलेली सोपी पळवाट आहे हे सहज ध्यानात येते.

स्वातंत्र्यप्राप्तीपासून आजपर्यंत भारतातील उच्च शिक्षणाचे प्रमाण हे फारसे समाधानकारक राहिले नाही. याचे मुख्य कारण म्हणजे एकंदर शिक्षण व्यवस्थेतील गळती होय. शिक्षणातील गळतीचीही अनेक सामाजिक, आर्थिक व भौतिक कारणे आहेत. गळती संदर्भात आपल्याकडे ठोस उपाययोजना व त्यांची अंमलबजावणी यांचाही अभावच दिसून येतो. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय शिक्षण धोरणात काही निर्णायक बाबी असणे अपेक्षित होते. परंतु तसे न होता उच्च शिक्षणातील शैक्षणिक गळतीचे अप्रत्यक्षरित्या समर्थन केल्याची भूमिका येथे दिसून येते. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या मसुद्यात उच्च शिक्षणाच्या प्रकरणात म्हटले गेले आहे की, ‘‘अभ्यासक्रमाच्या कल्पक व लवचिक रचनेमुळे अभ्यासाच्या विविध शाखांचे व विषयांचे कल्पक मिश्रण निर्माण करणे शक्य होईल आणि विद्यार्थ्यांना अनेक उपयुक्त आगमन व बहिर्गमन मार्ग (Entry and Exit Points) प्राप्त होतील.’’[५] मसुद्यात मांडण्यात आलेल्या Multiple Entry व Multiple Exit या संकल्पनांचा शैक्षणिक गळतीच्या समर्थनाशिवाय दुसरा कोणता अर्थ निघू शकतो? कोणत्याही पदवी शिक्षणात जर विद्यार्थ्याने १ वर्षाचे शिक्षण पूर्ण केले तर त्याला ‘पदविका’ म्हणावे. जर त्याने २ वर्षाचे शिक्षण पूर्ण केले तर त्याला ‘प्रगत पदविका’ (Advanced Diploma) म्हणावे. ३ वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास ‘पदवी’ (Batchler) म्हणावे तर ४ वर्षाचा किंवा संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण केल्यास ‘प्रगत पदवी’ (Andvanced Degree) म्हणावे, असा शाब्दिक खेळ येथे केला आहे. या गोंडस शब्दांचा वापर करून विद्यार्थी व एकंदर समाजाला शैक्षणिक गळतीची जाणीवच न होऊ देता सरकारने उच्च शिक्षणातील शैक्षणिक गळतीचे समर्थनच केले आहे, असे स्पष्ट होते.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या मसुद्यात वारंवार ‘शिक्षणाच्या व्यापारीकरणाला आळा घालण्याचा प्रयत्न केला जाईल’ असे म्हटले आहे. परंतु असे म्हणणे केवळ वरवरचे असून शिक्षणाच्या व्यापारीकरणाला जबाबदार असणाऱ्या कुठल्याच बाबींची कारणमीमांसा न करता व्यापारीकरण्याच्या प्रक्रियेला बळकटी देण्याचे धोरण अनेक बाबतीत दिसून येते. जसे ‘उच्च शिक्षण’ या प्रकरणात म्हटले आहे की, ‘‘विनिमय निकषानुसार खाजगी व सरकारी संस्थांना एकसमान मानण्यात येईल. शिक्षणाचे व्यापारीकरण थांबविले जाईल आणि परोपकारी वृत्तीने शिक्षण प्रसार करण्यास प्रयत्नशील असणाऱ्या व्यक्तींना व संस्थांना उत्तेजन दिले जाईल.’’[६] येथे सरकारने शिक्षणाच्या खाजगीकरणाला उत्तेजन दिले आहे. एवढेच नव्हे तर, शिक्षणाचा सर्रास व्यापार करणाऱ्या भांडवलदार वर्गाला ‘परोपकारी’ (Philonthropist) म्हणत त्यांचे उदात्तीकरण केले आहे. खरे पाहता, आजच्या भांडवली जगात कुणीही कुणावर परोपकार करत नसून सदरील भांडवलदार व सरकार यांची युती शिक्षणाच्या व्यापारीकरण्यासाठी बाजार उभा करण्याचा अवकाश निर्माण करीत आहेत. शिवाय आजपर्यंत शिक्षणाच्या व्यापारीकरण्यासाठी खाजगीकरण हेच महत्त्वाचे कारण ठरले आहे. या वास्तवाची कुठलीच जाणीव न ठेवणे हे अत्यंत विसंगतीपूर्ण आहे.

**निष्कर्ष :**

थोडक्यात, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ च्या माध्यमातून भारतातील शिक्षण क्षेत्रात कुठलाच सकारात्मक व मूलभूत बदल होत नसून उलट शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, शिक्षणाची रोजगाराभिमुखता व

शिक्षणाची फलदायी उत्पादकता अशा निरनिराळ्या दृष्टिकोनातून मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण होत आहेत. शिक्षण क्षेत्राचे राष्ट्रीयीकरण होण्याऐवजी यातून शिक्षणाच्या खाजगीकरणाला व परिणामी बाजारीकरण व व्यापारीकरणाला बळकटीच मिळणार आहे. आजच्या विषमताग्रस्त वातावरणात शिक्षणातील हे आव्हान अधिकाधिक गंभीर व विदारक ठरणार आहे. त्यामुळे वेळीच भारतातील लोकमानस जागृत होणे आवश्यक आहे. भारतातील सर्व विद्यार्थ्यांना समान, दर्जेदार, मोफत व राज्यवित्तपोषित शिक्षण मिळवण्याच्या सामूहिक प्रयत्नातूनच यावर मात करता येईल.

**संदर्भ :**

१. रमेश बिजेकर, 'जनतेच्या शिक्षण कत्तलीचा जाहीरनामा : राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९' प्रकाशक – डॉ. प्रभाकर गायकवाड, औरंगाबाद. पृ. क्र. ४.
२. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ मसुदा (मराठी सारांश) मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार 'शालेय शिक्षण', प्र. ७ (अ)
३. राष्ट्रीय शिक्षा नीति २०१९ (मूळ मसुदा) मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार अ. ७, पृ. क्र. २२४
४. तत्रैव, अ. ७ पृ. क्र. २१८
५. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ मसुदा (मराठी सारांश) मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार 'उच्च शिक्षण', प्र. २ (इ)
६. तत्रैव, उच्च शिक्षण', प्र. ५ (इ)